# नियमित दिवाणी दावा नं. ३२८/२०२३ मधील नि. २७ वरील आदेश.

(सी.एन.आर नं. **MHAH**230008902023)

१) अर्ज व शपथपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नि.१०, व आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्तीसाठी दाखल केला असुन अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. दावा मिळकत गट नं. १९३९ पैकी वादीची आई जानकीबाई डहाळे हिचे नावे आलेल्या ०.०२ आर क्षेत्रापैकी वादीच्या हिश्याचे ६६.६६ चौ.मी. क्षेत्राशी वादी व्यतीरिक्त अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध नव्हता. परंतु, दिनांक ०१/११/२०१८ रोजी वादीची आई जानकीबाई डहाळे मयत झाल्यानंतर त्यांचेमध्ये सन २००२ साली झालेल्या वाटपाप्रमाणे ०.०२ आर क्षेत्रास वादी व त्याचे भावांची नावे लागण्याऐवजी वादीसह एकूण तीन मुलांची व दोन मुलींची सामाईक क्षेत्र म्हणून फेरफार नं. २३६१७ अन्वये नोंद झाली आहे.

२) तसेच दावा मिळकतीसंबंधी प्रतिवादी क्र. २ यांनी दिनांक ३१/०८/२०२३ रोजी दिलेली नोटीस ही केवळ वादीच्या नावे असल्यामुळे दावा मिळकत ०.०२ आर क्षेत्राशी हितसंबंधी व्यक्ती म्हणून वादींनी त्याचे सर्व भाउ व बहिणींना दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक होते. परंतु, अनावधानाने व नजरचुकीने त्यांना आवश्यक पक्षकार करणे राहुन गेले आहे. त्यामुळे दाव्यात तांत्रीक त्रुटी निर्माण होवू नये याकरीता दावा मिळकतीच्या सात बारा उता–यावरील ०.०२ आर क्षेत्रावर नोंद असलेल्या संजय डहाळे, राजेंद्र डहाळे, छाया भांबुर्डेकर व अर्चना मुंडलिक यांना दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणजेच प्रतिवादी क्र. ४ ते ७ म्हणून सामील करण्याची व त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करण्यास

परवानगी मिळण्याची वादीने विनंती केली आहे. वादीचे म्हणण्याप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास, प्रतिवादीचे कोणतेही कायदेशीर नुकसान होणार नसून मुळ दाव्यामध्ये तांत्रीक दोष न राहता गुणदोषावर चौकशी होवून न्यायनिर्णय होण्यास मदत होणार आहे. सबब, प्रस्तुत अर्ज.

३) प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी अर्जापाठीमागे त्यांचे म्हणणे देवून विरोध दर्शविला असुन त्यांचे म्हणण्याप्रमाणे अर्ज खरा व कायदेशीर नाही. वादीने दावा दाखल करतेवेळी सात बारा उतारा पाहुनच दावा दाखल केलेला आहे. तसेच वादीने प्रस्तावित दुरुस्तीबाबत कोणताही कायदेशीर पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी केली आहे.

४) प्रस्तुत अर्जातील कथन, व प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचे म्हणणे यांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत व निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणमिमांसेह नोंदवित आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांचा दुरुस्तीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ व २ करिता –

५) अभिलेखाचे अवलोकन करता, प्रस्तुतचा दावा हा गट नं. १९३९ पैकी ०.०२ आर क्षेत्रासंबंधी निरंतर ताकीद हुकूम मिळणेकामी दाखल केल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने

नि. ३/१ लगत दाखल केलेल्या गट नं. १९३९ च्या सात बारा उता–याचे अवलोकन केले असता ०.०२ आर क्षेत्रास वादीसह संजय डहाळे, राजेंद्र डहाळे, छाया भांबुर्डेकर व अर्चना मुंडलिक यांची नावे सामाईक क्षेत्रात नमूद करण्यात आले आहेत. अद्याप दावा हा चौकशीकरीता नेमण्यात आलेला नाही. अशा परिस्थितीत, सदर दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी वर नमूद इसम यांना प्रतिवादी क्रमांक ४ ते ७ म्हणुन दाव्यात सामिल करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीचे कथनाप्रमाणे प्रस्तुत अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत असून मुद्दा क्र. २ करीता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज (नि.२७) मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी दाव्यात प्रस्तावित दुरुस्ती करुन पुढील तारखेपर्यंत दुरुस्त प्रत न्यायालयात दाखल करावी.

३. खर्चासंबंधात कोणतेही आदेश नाहीत.

श्रीगोंदा.
दिनांक २२/११/२०२३.

**(अ.ना. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.